# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६९०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/१०/२०१६

**१) विषारी औषध म्हशीचे टाक्यात टाकल्याने म्हैस व वघारीचा मृत्यु झाल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक १७/१०/२०१६ रोजी १५.०० वा. दर. यातील संशईत आरोपीने म्हशीचे पाण्याचे टाक्या मध्ये कोणीतरी विषारी औषध टाकल्याने ते पाणी म्हशीने पिल्याने १ म्हैस व वघार मरण पावल्याने कि. ९०,०००/-रु. चे नुकसान झाल्याने पशु वैद्यकीय अधिकारी यांचे वैद्यकीय परीक्षण रिपोर्ट वरुन व चौकशी अहवाला वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४२९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**२) भंडारा पोलीस यांची कारवाई . :-**

दिनांक १८/१०/२०१६ ते १९/१०/२०१६ रोजी २०.५० ते ०२.०० वा. दर. यातील आरोपीचे घराची मुखबीर खबरे वरुन पंचा समक्ष घर झडती घेतली असता त्याचे माच घराचे दाराचे बाजुला लोखंडी आलमारीचे खालील बाजुस लोखंडी रॉडचे गॅप मध्ये निळया व लाल रंगाच्या पिशवीत कागदाच्या ४० नग पुडया ज्यात कथ्थ्या (गडद ब्राऊन) शुगर वजन ०३ ग्रॅम, ४१० मिली गॅम कि. ३,४१०/-रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनि. डी. सावने अम्ली विरोधी पथक भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २२ एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) आमरोडवर लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :-**

दिनांक १९/१०/२०१६ रोजी १३.३० ते १४.१५ वा. दर. यातील आरोपीने आपल्या ताब्यातील ऑटो रिक्सा क्र. एमएच ३६/३४९१ ही सार्वजनिक ठिकानी आमरोडवर येना-या जाना-या लोकांच्या जिवितास धोका व वाहतुकीस अळथळा होईल अशा स्थितीत उभी करून मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. ढोक यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. लाखांदुर येथे कलम २८३ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. ढोक पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**४) विषारी सर्पदंशाने इसमाचा मृत्यु . :-**

दिनांक. १९/१०/२०१६ रोजी १४.३० वा. दर. यातील मृतक रामचंद्र सावजी कावळे वय ६४ वर्ष, रा. पालोरा हा गि-हेपुंजे यांच्या शेतात मजुरीचे काम करीत असतांनी त्याला कोणत्या तरी विषारी सापाने उजवे पायाच्या टोग-यांचे खाली चावा घेतल्याने तो मरण पावल्याने फिर्यादी सुखदेव पांडुरंग कावळे वय ४७ वर्ष, रा. पालोरा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :-

दिनांक १८/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ८९ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०४ तसेच तिन सिटर वाहनांवरती ०२ केसेस व ईतर वाहनांवरती ८३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

२०/१०/१६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.